कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/२०२/२०२६ दि. १४/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, कासारवडवली वाहतुक उपविभागाचे हददीत, एम.एम.आर.डी.ए कडून कासारवडवली ओव्हर ब्रिजचे दुरूस्तीचे काम होणार असुन दुरूस्तीचे कामाकरीता कासारवडवली ओव्हर ब्रिज हा सर्व प्रकारच्या वाहनां करीता दिनांक १५/०९/२०२६ रोजी रात्रौ २४:०० वा. पासुन सदर ओव्हर ब्रिजचे दुरूस्तीचे काम पुर्ण होईपर्यंत पुर्णपणे बंद करून सर्व प्रकारची वाहतुक हि स्लिप रोड मार्गे वळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील प्रमाणे **वाहतुकीत बदल** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद –	१) ठाणे दिशेकडून घोडबंदर गुजरात रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कासारवडवली ओव्हर ब्रिजचे सुरवातीला 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग – जड अवजड वाहनांकरीता	ठाणे दिशेकडून घोडबंदर गुजरात रोडच्या दिशेने जाणारे जड अवजड वाहने ही ' कासारवडवली ओव्हर ब्रिज लगतच्या स्लिप रोड मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.
पर्यायी मार्ग – हलक्या वाहनांकरीता	**अ)** ठाणे दिशेकडून घोडबंदर गुजरात रोडच्या दिशेने जाणारे छोटी वाहने (कार, ॲटो रिक्षा, मोटर सायकल, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विर्सजनातील वाहने व इतर अत्यावश्यक वाहने) ही विजय गार्डन डी मार्ट – कासारवडवली पोलीस स्टेशन – पुढे उजवी कडे वळण घेवून सरळ –ग्रॅन्ड स्क्वेअर चौक –विहंग व्हॅली चौक– टायटन हॉस्पीटल येथुन डावे वळण घेवून ठाणे घोडबंदर मुख्य वाहिनीवरून पुढे इच्छित स्थळी जातील. **ब)** ठाणे दिशेकडून घोडबंदर गुजरात रोडच्या दिशेने जाणारे छोटी वाहने (कार, ॲटो रिक्षा, मोटर सायकल, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विर्सजनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने) ही आनंद नगर सिग्नल येथुन डावे वळण घेवून – ग्रॅन्ड स्क्वेअर चौक –विहंग व्हॅली चौक– टायटन हॉस्पीटल येथुन डावे वळण घेवून ठाणे घोडबंदर मुख्य वाहिनीवरून पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक १५/०९/२०२६ रोजी रात्रौ २४:०० वा. पासुन ओव्हर ब्रिजचे दुरूस्तीचे काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत मा. सविनय सादर

मा.जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
मा.अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
मा.अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा.पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,

मा.पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
मा.पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
मा.पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
मा.पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ ठाणे, परिमंडळ – २ भिवंडी, परिमंडळ – ३ कल्याण, परिमंडळ – ४ उल्हासनगर, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

प्रत :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

प्रत :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कासारवडवली, कापूरबावडी, कळवा, नारपोली, भिवंडी, मुंब्रा, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर

प्रत :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.